www.rajdand.com
सातारा, सोमवार
13.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.८
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

रॉड्रिग्जचं अर्धशतक, ऋचाची फटकेबाजी; भारताचा पाकिस्तानवर सात विकेट्सनं विजय

पान ४ वर..



# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर, रमेश बैस महाराष्ट्राचे नवे राज्यपाल

**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजूर केला आहे.याबाबतची माहिती राष्ट्रपती भवनाकडून देण्यात आली आहे. रमेश बैस यांची महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बैस हे महाराष्ट्राचे २० वे राज्यापाल आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून विरोधी पक्षांनी राज्यपाल कोश्यारी यांच्या विरोधात आवाज उठवला होता. राज्यपालांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांनी केली होती. अखेर आज कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. आज एकूण १३ नवीन राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती भवनाकडून करण्यात आली आहे.**

रमेश बैस यांचा जन्म २ ऑगस्ट १९४७ मध्ये छत्तीसगढच्या रायपूरमध्ये झाला. १९७८ मध्ये ते सर्वप्रथम नगरपालिकेत निवडून आले होते. १९८० ते ८४ मध्ये मध्यप्रदेश विधानसभेचे सदस्य होते. रमेश बैस यापूर्वी झारखंड आणि त्रिपुरा राज्याचे राज्यपाल होते. छत्तीसगढ राज्यातील रायपूर लोकसभा मतदारसंघातून सलग सात वेळा ते खासदार होते. रमेश बैस यांनी केंद्रातही राज्यमंत्रीपद भूषवले आहे.



भगतसिंह कोश्यारी यांनी राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांनी पत्र लिहिले होते. वारंवार केल्या जाणाऱ्या वादग्रस्त वक्तव्यांनंतर कोश्यारी यांना मोठा विरोध झाला होता. आज अखेर त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. भगतसिंह कोश्यारी हे महाराष्ट्राच्या इतिहासातले सर्वात चर्चित ठरलेले राज्यपाल ठरले आहेत. त्यांनी सर्वात आधी मुंबईत बोलताना मुंबई-ठाण्यातील गुजराती आणि राजस्थानी लोकांबद्दल कौतुकाचे उद्गार काढले होते. मुंबई आणि ठाण्याबद्दल त्यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. महाराष्ट्रामध्ये विशेष करून मुंबई आणि ठाण्यातून गुजराती किंवा राजस्थानी लोकांना काढू टाकले, तर तुमच्याकडे पैसेच उरणार नाही. मुंबईही आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते, पण ती आर्थिक राजधानी म्हणून ओळखलीच जाणार नाही, असं वक्तव्य भगतसिंह कोश्यारी यांनी केलं होतं. त्यानंतर संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर समर्थ रामदास यांच्याविना छत्रपती शिवाजी महाराजांना कोण विचारेल? असं वादग्रस्त वक्तव्य केल्याने पुन्हा ते अडचणीत आले होते. चाणक्यांशिवाय चंद्रगुप्ताला कोण विचारेल? समर्थांशिवाय शिवाजीला कोण विचारेल? गुरुचं आपल्या समाजात मोठं स्थान असतं, तसंच छत्रपतींनी मला माझं राज्य तुमच्या कृपेने मिळालं आहे, असं समर्थांना म्हटलं, अशा आशयाचं वक्तव्य कोश्यारींनी केलं होतं.

## भाऊंच्या विकासकामांमुळेच मतदार अश्विनी जगताप यांना विजयी करणार – ना. चंद्रकांत पाटील

**पिंपरी : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले. पेट्रोल-डिझेलचा व्हॅट रद्द केला. सात लाखांपर्यंत उत्पन्न करमुक्त केले. सरकारी योजनेतून ३०० चौरस फुटाचे घर देण्याची घोषणा केली. दिलासा मिळतो तेव्हा कोणीही मोदीजी जिंदाबादच म्हणतो. चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनीही दूरदृष्टी ठेवून चिंचवड मतदारसंघात विकासकामे केली. त्यातून संपूर्ण शहरातील नागरिकांच्या जीवनमानात लक्षणीय बदल झाला. हा बदल जनतेला कळतो. भाऊंनी केलेल्या विकासकामांमुळेच ही जनता पोटनिवडणुकीत अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करणार याची मला पूर्ण खात्री असल्याचे पालकमंत्री आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी (दि. १२) सांगितले.



चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपा, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय आठवले गट, राष्ट्रीय समाज पक्ष, शिवसंग्राम, रयत क्रांती व प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचार कार्यालयाचे काळेवाडी, तापकीरनगर येथे चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, खासदार श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, माजी महापौर माई ढोरे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, आरपीआय आठवले गटाचे शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे, रासपचे शहराध्यक्ष भरत महानवर, प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष विनोद गायकवाड, लोकजनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष संजय आल्हाट, हरेश तापकीर यांच्यासह भाजप व मित्रपक्षाचे माजी नगरसेवक, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, देशात भाजपाची सत्ता आल्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या प्रमाणात विकास केला. अनेक सुविधा निर्माण केल्या. देशभर रस्त्यांचे जाळे विणले. दळणवळणाच्या सुविधा निर्माण झाल्याने देशाची प्रगती वेगाने होत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात पंतप्रधान मोदी यांनी सात लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून सामान्यांना दिलासा दिला आहे. त्यांनी तीनशे चौरस फुटाचे घर सरकारी योजनेतून मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे.

स्वच्छ अभियानामुळे घरापासून ते गावकुसापर्यंत शौचालये उभारली गेली. महाराष्ट्रात पेट्रोल व डिझेलवरील व्हॅट रद्द केला. आमच्या सरकारने एसटीमध्ये ७५ वर्षांपुढील ज्येष्ठांना मोफत प्रवासाचा निर्णय घेतला. ठाकरे सरकारने बंद केलेली मुख्यमंत्री आरोग्य सहाय्य योजना सुधारित केली. या योजनेतून गरजू रुग्णांपर्यंत १०० कोटींहून अधिक रक्कम पोहोचली आहे. अशी अनेक लोकोपयोगी कामे भाजप आणि शिवसेना पक्षाने केली आहेत. त्यामुळे मतदार कामे करणाऱ्या सरकारच्या बाजूने उभे राहणार आहेत.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनीही चिंचवड मतदारसंघात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे. त्यांनी दूरदृष्टी ठेवून मतदारसंघाचा कायापालट केला आहे. त्यामध्ये त्यांच्या कुटुंबाचेही योगदान आहे. या विकासकामांमुळेच येथील नागरिकांच्या जीवनमानात लक्षणीय बदल झालेला आहे. येथील जनता विकासकामाला प्राधान्य देणारी आहे. जनतेला लक्ष्मण जगताप यांनी केलेला विकास दिसतो आहे. त्यामुळेच ही जनता लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करणार याची मला पूर्ण खात्री असल्याचे त्यांनी सांगितले.

## पुण्यात दुहेरी हत्याकांड, रक्ताने माखलेला टिकाव घेऊन आरोपी रस्त्यावर

### पोलिसांनी घेतलं ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्याच्या दापोडीत दुहेरी हत्याकांडाने एकच खळबळ उडाली आहे. आरोपी रक्ताने माखलेला टिकाव घेऊन रस्त्यावर फिरत होता. या प्रकरणी आरोपीला भोसरी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शंकर नारायण काटे (वय- ६०) आणि संगीता काटे (वय- ५५) अशी हत्या झालेल्या पती-पत्नींची नावे आहेत. प्रमोद मगरुडकर (वय- ४७) असे आरोपीचे नाव असून त्याला भोसरी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दुहेरी हत्याकांडाच्या घटनेनं पिंपरी चिंचवड हादरलं आहे. अद्याप या दुहेरी हत्येचे कारण समजू शकेलेले नाही. दापोडीत बेसावध असलेल्या दाम्पत्यावर टीकावाने घाव घालून दुहेरी हत्या करण्यात आली आहे. काटे दाम्पत्य हे त्यांच्या घरात बसले होते. तेव्हा, आरोपी प्रमोद त्यांच्यावर टिकावाचे घाव घातले. ही घटना शनिवारच्या रात्री दहा वाजता समोर आली आहे. आरोपी प्रमोद हा हत्या करून रक्ताने माखलेला टिकाव घेऊन रस्त्यावर दिसला. हे पाहून नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ येऊन आरोपीला ताब्यात घेतले आहे. प्रमोद हा नुकताच दिल्लीवरून आलेला आहे.

## पवई आयआयटीतील विद्यार्थ्यानं संपवलं जीवन

**मुंबई** : पवई आयआयटीमध्ये एका विद्यार्थ्याने वसतिगृहाच्या सातव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. दर्शन सोलंकी ( वय १९) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थीचे नाव आहे. दर्शन हा मूळचा हैद्राबादचा असून तो तीन महिन्यापूर्वीच शिक्षणासाठी आयआयटी मुंबईत आला होता. कालच त्याची परीक्षा झाली होती आणि आज त्याने हे टोकाचं पाऊल उचललं आहे. दरम्यान, या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

दर्शन आयआयटीमध्ये बी. टेकच्या पहिल्या वर्षात शिकत होता. तो आयआयटीतील१६ नंबर वसतिगृहाच्या ८०२ खोलीत राहत होता. दुपारी अचानक वसतिगृहाच्या परिसरात काही तरी पडल्याचा आवाज आल्याने एकच धावपळ झाली. त्यावेळी तेथील कर्मचाऱ्यांनी बघितल्यावर दर्शन रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला.

## नैराश्य न बाळगता युवकांनी शेतीत रोजगाराच्या संधी शोधाव्यात

### राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन; नारायणगाव येथे कृषी विज्ञान केंद्राच्या प्रांगणात कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

**नारायणगाव : (सा.वा.)**

शेती हाच रोजगार देणारा व्यवसाय आहे . सध्या तरुणांमध्ये शेती करण्यासंदर्भात नैराश्य आहे . तरुणांनी शेतीमध्ये रोजगाराच्या संधी शोधल्या पाहिजे . यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे . रासायनिक खते व औषधाचा वापर कमी होण्यासाठी शेतकऱ्यांनी उठाव केला पाहिजे असे आवाहन राज्याचे महसूल व पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नारायणगाव येथे आज केले .

ग्रामोन्नती मंडळाच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आयोजित ग्लोबल कृषी जिल्हा महोत्सव २०२३ अर्थात कृषी विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन महसूल व पशुसंवर्धन विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले . यावेळी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील ,आमदार अतुल बेनके ,माजी आमदार शरद सोनवणे ,जिल्हा नियोजन समिती सदस्या आशाताई बुचके ,अटारी झोन ८ पुणेचे माजी संचालक डॉ लाखन सिंग , कृषी विस्तार संचालक विकास पाटील, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष काटकर , कृषी विकास अधिकारी , अनिल देशमुख , प्रांताधिकारी सारंग कोडोलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी मंदार जवळे, तहसीलदार रवींद्र सबनीस, गटविकास अधिकारी शरद माळी,कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर ,ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे ,उपाध्यक्ष सुजित खैरे, कार्यवाह रवींद्र पारगावकर , तानाजी वारुळे,अल्हाद खैरे, शशिकांत वाजगे, सुरेश संचेती , डॉ आनंद कुलकर्णी, डॉ संदीप डोळे, रत्नदीप भरवीरकर, एकनाथ शेटे, ऋषिकेश मेहर, देविदास भुजबळ, रमेश जुन्नरकर, केव्हीके प्रमुख डॉ प्रशांत शेटे, अशोक घोडके , सुरज वाजगे , जयवंत घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

राधाकृष्ण विखे म्हणाले की, शेतकरी व कृषी संशोधन यांच्यामधील कृषी विज्ञान केंद्र हे समन्वयाचे व्यासपीठ आहे. शेतकरी हाच खरा शास्त्रज्ञ आहे शेतकऱ्यांनी उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आव्हान स्वीकारले पाहिजे. शेती प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले शेती माल स्वतः विकून त्यातून आर्थिक स्रोत निर्माण केला पाहिजे हीच काळाची गरज आहे. कृषी प्रदर्शनामुळे ऊर्जा मिळाली आहे.

रासायनिक खते व औषधाच्या वापरामुळे



**नारायणगाव येथे कृषी विज्ञान केंद्रा मध्येग्रामोन्नती मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अतुल बेनके, आशाताई बुचके व ग्रामोन्नती मंडळाचे पदाधिकारी.**

महिलांमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे .याविषयी विखे यांनी चिंता व्यक्त्त केली .

या प्रसंगी ग्रामोन्नत्ती कृषी सन्मान पुरस्कार व पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले .

प्रास्तविकात अनिल मेहेर यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची व उपक्रमांची व शेतकऱ्यांसाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहे याची माहिती दिली. जुन्नर ,आंबेगाव तालुक्यातील भाजीपाला , फळ , पिके ही विषमुक्त करून नैसर्गिक शेतीकडे व्हावी यासाठी के व्ही के च्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. तालुक्यातील शेती माल निर्यात होत आहे . शेतीमाल हा ब्रँडिंग केल्याशिवाय आर्थिक प्रगती होणार नाही. तालुक्याचा प्रसिद्ध असलेला शिवनेरी हापूस आंब्याला जी आय मानांकन मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत

पाटबंधारे विभागाने नुकतेच शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पाणीपट्टीमध्ये सहा पटीने वाढ केली आहे . जुन्नर तालुक्यात बिबट्यांचा वावर जास्त वाढला आहे . रात्री शेतीसाठी वीज मिळत असल्याने शेतकरी सर्पदंश व बिबट्याच्या हल्ल्याने त्रस्त झाला आहे .याकडे विशेष मागणीकडे सरकारने लक्ष द्यावे अशी मागणी मेहेर यांनी सरकारकडे केली आहे.

याप्रसंगी आमदार अतुल बेनके यांनी शेतकऱ्यांच्या विविध योजना विषयीची माहिती दिली. तसेच कृषी खात्याने शेतकरी हिताच्या दृष्टीने असलेल्या सर्व योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवाव्या असे आवाहन केले. आशाताई बुचके तसेच कृषी अधिकाऱ्यांनी यावेळी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील ढवळे मेहबूब काझी यांनी केले तर आभार ग्रामोन्नती मंडळाचे उपाध्यक्ष सुजित खैरे यांनी मानले.

## पंतप्रधानांनी स्वत:वरील जाहिरातींवरचा खर्च टाळून गोरगरिबांची पोरं शिकवण्याचं धाडस करावं - सूषमा अंधारे

### शिवसेना महाप्रबोधन यात्रेत सुषमा अंधारे व सचिन अहिर यांचा घणाघात

**नारायणगाव : (सा.वा.)**

जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा सुधरविण्यासाठी किंवा गोरगरिबांची मुलं चांगल्या शाळेत शिकण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वतःच्या जाहिरातींवरचा खर्च कमी करावा व अनाठाही होणारा खर्च गोरगरिबांच्या शिक्षणासाठी वापरावा असा टोला वजा सल्ला शिवसेनेच्या उपनेते सुषमा अंधारे यांनी शिवजन्मभूमी जुन्नर येथे दिला.

शिवसेना महाप्रबोधन यात्रेच्या निमित्ताने शिवसेना उपनेते सुषमा अंधारे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी शिवसेना संपर्क प्रमुख आमदार सचिन अहिर, जिल्हा प्रमुख सुरेश भोर, माजी आमदार बाळासाहेब दांगट, अविनाश रहाणे, जिल्हा महिला संघटक श्रद्धा कदम, विजया शिंदे, जयश्री पलांडे, नगरसेविका दिपमाला बढे, मंदाकिनी दांगट, शिवसेना संपर्क प्रमुख दिलिप बामणे, संभाजी तांबे,




तालुका प्रमुख माऊली खंडागळे, जोत्स्ना महाबरे, गुलाब पारखे, अनिल डोके, अशोक खांडेभराड, रामदास धनवटे, प्रसन्ना डोके,शरद चौधरी, सुनिता बोऱ्हाडे, संदीप शिंदे, सरपंच बाबू पाटे, बाबा परदेशी, सुनील मेहर, श्याम पांडे, जयवंत घोडके, सुनील ढवळे, भास्कर गाडगे, मंगेश काकडे, संतोष वाजगे, नगरसेविका किरण जठार आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सुषमा अंधारे यांनी भाजप व शिंदे सरकारवर चौफेर टीका करत उपस्थित शिवसैनिकांना आपल्या भाषणाच्या ओघवत्या शैलीत मंत्रमुक्त केले. यावेळी शिवसेना उपनेते आमदार सचिन अहिर, माजी आमदार बाळासाहेब दांगट, माऊली खंडागळे, काळू शेळकंदे आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

**कार्यक्रम झाल्यानंतर पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना शिवसेना उपनेते अंधारे व आमदार सचिन आहेर यांनी समर्पक उत्तर दिली यावेळी शिवसेनेचे फुटून गेलेले काही आमदार पुन्हा स्वगृही परतणार का या प्रश्नावर बोलताना अंधारे म्हणाल्या की, चाळीस आमदार जे फुटून गेले त्यांच्यामध्ये अस्वस्थता पसरली आहे. माजी मंत्री व आमदार संजय राठोड यांना शिवसेनेचे कापले असताना इकडे येण्याची ओढ आहे आमदार संजय शिरसागर मंत्री अब्दुल सत्तार हे तिकडे अस्वस्थ आहे माजी मंत्री व आमदार बच्चू कडू यांना पुरेशी स्पेस म्हणजे जागा मिळत नाही तसेच परत येणारे अनेक आमदार आमच्या संपर्कात आहेत तसेच मातोश्रीची ओढ त्यांना आहे व मातोश्री त्यांना प्रेमाने परत घेईल असे सांगितले. महाविकास आघाडी येणाऱ्या निवडणुकीत एकत्रच लढेल व आमच्यात कुठलेही आघाडीत बिघाडी नाही असे एका प्रश्नाचे उत्तर देताना आमदार सचिन अहिर यांनी यावेळी सांगितले कोस्टल रोडला हिंदुरुदय सम्राट सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्यायला कोणाचेही दुमत नसेल असे त्यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिका तसेच इतर निवडणुकांबाबत विचारलेल्या प्रश्नावर आमदार सचिन आहेर म्हणाले की भाजप व शिंदे सरकार मुद्दामहून निवडणूक पुढे ढकलण्याचे षडयंत्र करत आहे.**

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुकाप्रमुख माऊली खंडागळे यांनी केले आभार जिल्हाप्रमुख सुरेश भोर यांनी मानले.

## भाजपने राज्यपालांकडून महाराष्ट्राची बदनामी करून घेतली : नाना पटोले

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपने भगतसिंह कोश्यारींकडून महाराष्ट्राची बदनामी करुन घेतली आणि कोश्यारींनी संपूर्ण कार्यकाळात पक्षपातीपणा केला, अशी टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी कोश्यारींवर केली आहे. ते पुण्यात बोलत होते. राज्यापाल भगत सिंह कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर सगळ्या विरोधकांकडून प्रतिक्रिया येत आहेत त्यात नाना पटोले यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.

ते म्हणाले की, भाजपने कोश्यारींकडून महाराष्ट्राची बदनामी करुन घेण्याचं काम केलं. बदनामी करण्याचं काम पूर्ण झालं असं भाजपला वाटलं असेल म्हणून भाजपने आता भगतसिंह कोश्यारींना राज्यपाल पदावरुन हटवण्यात आलं आहे. त्यांनी सर्व महापुरुषांच्या कामाचा आणि त्यांचा अपमान केला. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केला. त्यात सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी एवढ्या लहान वयात विवाह कसा केला, या वक्तव्याने त्यांनी केलेला सावित्रीमाईंचा अपमान मी आणि महाराष्ट्र कधीच विसरु शकणार नाही, असंही ते म्हणाले.

भगतसिंह कोश्यारींसारखा पक्षपाती राज्यपाल भाजपने महाराष्ट्राची बदनामी करण्यासाठी महाराष्ट्राला दिला होता. एका सर्व्हे नुसार महाविकास आघाडीचे ३८ खासदार आता महाराष्ट्रात निवडून येणार आहे.त्यात सगळ्यात मोठा वाटा राज्यपालांचा आहे. हे लक्षात आल्यावर भाजपने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी खुर्ची कायम राहिली पाहिजे यासाठी भाजपने केलेला हा प्रयत्न आहे. स्वत:ला महाशक्ती समजणारं नरेंद्र मोदींचं सरकार यांनी महापुरुषांना बदनाम करण्याचा निर्णय घेतला होता.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माळशिरस तालुकाध्यक्षपदी संतोष राऊत यांची निवड





**अकलूज : प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाच्या माळशिरस तालुका अध्यक्षपदी अकलूज येथील संतोष राऊत यांची निवड करण्यात आली आहे शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयातून सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी या पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या या आदेशाने नुकत्याच करण्यात आल्या आहेत.

गेली अनेक वर्ष शिवसेनेच्या तालुकाध्यक्षपदी अकलूज, बागेवाडी येथील नामदेव वाघमारे हे काम पाहत होते परंतु त्यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड केली असल्याचे शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयातून जाहीर करण्यात आले यामुळे या पक्षाच्या रिक्त झालेल्या माळशिरस तालुकाध्यक्षपदी संतोष राऊत यांची नवनियुक्ती झाली आहे तर शिवसेनेचे दत्ता पवार यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याचबरोबर अकलूज शहराध्यक्षपदी अनिल बंदपट्टे यांची निवड करण्यात आली आहे. या सर्व निवडी शनिवार दिनांक ११ फेब्रुवारीच्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

**गेल्या २५ वर्षापासून शिवसेनेत निष्ठेने काम करीत असून शिवसेनेच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या माध्यमातून रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, अन्नदान, शिवसेना पक्ष वाढीसाठी विविध उपक्रम वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली राबविले आहेत यापुढेही अनेक सामाजिक उपक्रम राबवून पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणारा असून वरिष्ठांनी माझ्यावर जी जबाबदारी टाकलेली आहे ती प्रामाणिकपणे पार पाडणार.**

**– संतोष राऊत, नवनियुक्त माळशिरस तालुकाध्यक्ष, शिवसेना**

# लोकांच्या मनात लक्ष्मणभाऊंचे अढळ स्थान; प्रचारात अश्विनी जगताप यांच्या भेटीने भाऊंच्या आठवणींनी लोक गहिवरतात, रडतात...

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाची उमेदवारी जाहीर होताच दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या निधनाचे दुःख बाजूला सारून त्यांच्या पत्नी आणि भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप प्रचाराच्या मैदानात उतरल्या आहेत. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी जिवाची पर्वा न करता पक्षानिष्ठा दाखवून दिली होती. त्यामुळे त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांच्या प्रचार मोहिमेत भाजप आणि मित्रपक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची त्यांना परिवारासारखीच साथ मिळत आहे. त्यांच्या साथीने अश्विनी जगताप यांनी प्रचारात आघाडी घेत संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदारसंघ अक्षरशः पिंजून काढला आहे. त्यांच्या प्रत्येक भेटीत दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आठवणीने लोक अक्षरशः गहिवरत आणि रडत असल्याचे चित्र आहे. लक्ष्मणभाऊंनी मतदारसंघात केलेला विकास, नागरिकांना केलेल्या मदतीच्या आठवणींना लोक उजाळा देत आहेत. तुम्हाला एक लाखांहून अधिक मताधिक्यांनी विजयी करूनच आम्ही लक्ष्मणभाऊंना खरी श्रद्धांजली वाहणार आहोत, असे वचनच लोक त्यांना देत आहेत.





अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या गृह भेटीला मतदारसंघातील महिलांचा उदंड प्रतिसाद मिळतो आहे. चांगले वक्तृत्व आणि महिला व युवतींशी सहज संवाद यामुळे त्यांचा गृहभेट दौरा निवडणूक प्रचारात कमालीचा प्रभावी ठरतो आहे. दररोज शेकडो घरात जाऊन त्या महिलांशी संवाद साधत आहेत. त्यांचे प्रश्न समजून घेत आहेत. त्यांच्या प्रत्येक भेटीत दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आठवणींनी लोक गहिवरत असल्याचे दिसून येत आहे. अनेकजण अक्षरशः रडतात.

डोळ्यात अश्रू घेऊनच लोक चिंचवड मतदारसंघ आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी लक्ष्मणभाऊ जगताप यांनी केलेले काम तसेच सर्व जाती-धर्मातील लोकांना केलेल्या मदतीला उजाळा देत आहेत. अश्रू पुसत पुसत अश्विनी जगताप यांना आम्ही तुम्हाला केवळ आमदार बनवणार नाही, तर मताधिक्याने निवडून देणार आहोत, असे वचनच हे लोक देत आहेत. त्यावरून लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या निधनाचे दुःख लोकांच्या मनातून गेलेले नसल्याचे जाणवत आहे. उलट निवडणूक प्रचारात अश्विनी जगताप यांच्या भेटीनंतर लोकांच्या मनात लक्ष्मणभाऊ जगताप यांचे स्थान किती अढळ आहे याची प्रचिती येत आहे. लोकांच्या या प्रेमामुळे भारावलेल्या अश्विनी जगताप दिवंगत पती लक्ष्मण जगताप यांच्या प्रेरणेने उत्साहाने प्रचार करत असल्याचे चित्र आहे.

# भोरमध्ये शिवरथ यात्रा पालखीचे जंगी स्वागत... 'जय भवानी जय शिवाजी' च्या जयघोषाने दुमदुमले शहर...

**भोर : प्रतिनिधी**

सह्याद्री प्रतिष्ठान आयोजित शिवनेरी ते रायगड शिवरथ यात्रा पालखीचे आगमन प्रथमच भोर मार्गे रायगड ला रवाना होण्यासाठी सोमवार (दि.६) रोजी भोर शहरामध्ये झाले असता तालुक्यातील शिवप्रेमींनी एसटी स्टँड जवळील प्रवेशद्वार रस्त्यांवर फुलांच्या पायघड्या घालून व शिवरथ पालखीवर पुष्पवृष्टी करत जंगी स्वागत केले.

सह्याद्री प्रतिष्ठान आयोजित छत्रपती शिवारायांची जन्मभूमी किल्ले शिवनेरी ते किल्ले रायगड शिवरथ यात्रा पालखी सोहळ्याचे हे १३ वे वर्ष असून ही शिवरथ पालखी यात्रा पहिल्यांदाच भोर मार्गे रायगड ला रवाना होण्यासाठी निघाली होती. यावेळी तालुक्या तील सर्व जाती धर्माच्या नागरिकांनी उपस्थित राहून एसटी स्टँड जवळील प्रवेशद्वार कमानीतील रस्त्यावर फुलांच्या पायघड्या घालून व शिवरथ पालखी वर पुष्पवृष्टी करत ''जय भवानी जय शिवाजी'',''छत्रपती शिवाजी महाराज की जय'' च्या नाऱ्याने संपूर्ण शहर दुमदुमल्याने वातावरण शिवमय झाले होते.





यावेळी एसटी स्टँड जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अहिल्यामाई होळकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला पुष्पहार घालण्यात आले. राजवाडा चौक येथे शिवव्याख्याते रविंद्र यादव यांचे ''वर्तुळा पलीकडचे शिवाजी महाराज'' या विषयावर व्याख्यान झाले. तसेच चौपाटी येथे महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला दूर्गसेवक नितीन भागवत, अजित थोपटे, गणेश बांदल यांनी पुष्पहार घालून मानवंदना दिली. यावेळी भव्य अशा शिवकालीन ऐतिहासिक मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

यावेळी चौपाटी परीसरात हजारोंची शिवप्रेमींनी राजकीय पक्षांच्या नेत्यांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी पालखीच्या दर्शनासाठी सहभाग नोंदवला ह्यासाठी विशाल दिंबले, प्रसाद किंद्रे, सिद्देश गाडे, सारंग भांडे, सिद्धेश वीर, कुणाल पवार,सिद्धेश कुडपने, या दुर्गसेवकांचे मोलाचे सहकार्य केले.

## प्रवासादरम्यान वृध्देचे दागिने लंपास

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा बसस्थानक ते उंब्रज या प्रवासादरम्यान १ लाख ४० हजार रुपये किंमतीचे ३३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण अज्ञाताने चोरल्याची घटना दि. १० रोजी सकाळी ८.५५ च्या दरम्यान घडली.

या प्रकरणी मंगल तानाजी जाधव (वय ६५, रा. क्षेत्रमाहुली, खावली, ता. सातारा) यांनी फिर्याद दिली असून, सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मंगल जाधव या बसद्वारे उंब्रजला निघाल्या होत्या. त्यांच्या हातातील बॅगमध्ये सोन्याचे गंठण होते. कोणी तरी अज्ञाताने चेन उघडून हे सोने लंपास केले. या प्रकरणाचा तपास पोलीस नाईक ठोंबरे करत आहेत.

# प्रवासादरम्यान महिलेच्या सोन्याच्या गंठणाची चोरी

**सातारा : प्रतिनिधी**

प्रवासादरम्यान महिलेच्या सोन्याच्या गंठणाची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी आठ पंचावन्न ते दहा वाजण्याच्या दरम्यान मंगल तानाजी जाधव राहणार क्षेत्रमाहुली, खावली, ता. सातारा या सातारा ते उंब्रज असा प्रवास करीत असताना त्यांच्या हातातील बॅगेची चेन अर्धी खोलून अज्ञात चोरट्याने बागेतील १ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले आहे. याबाबतची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून अधिक तपास पोलीस नाईक ठोंबरे करीत आहेत.

## यवतेश्वर येथून बुलेटची चोरी

**सातारा** : यवतेश्वर, ता. सातारा येथील यवतेश्वर घाटाजवळ असलेल्या पाईपलाईनजवळील रस्त्याकडेला उभी केलेल्या बुलेट गाडी (एमएच ३ बीआर ४०८१) चोरीला गेल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. ही घटना दि. ५ रोजी रात्री घडली. या प्रकरणी कुणाल राजाराम जाधव (वय २०, रा. शिवाजीनगर, शाहूपुरी, सातारा) यांनी फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार पवार हे तपास करत आहेत.

# महाराजस्व अभियानाचे १४ रोजी मेढा येथे आयोजन

**मेढा : प्रतिनिधी**

जावली तालुक्यातील मेढा व केळघर मंडलातील लाभार्थी यांच्यासाठी महाराष्ट्र शासन महाराजस्व अभियान -शासन आपल्या दारी हा कार्यक्रम महसूल विभाग व जावली तालुका प्रशासन यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी मेढा येथील कलश मंगल कार्यालय येथे सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजता या वेळेत आयोजित केला आहे. अशी माहिती तहसिलदार राजेंद्र पोळ यांनी दिली.

सदरचा कार्यक्रम जिल्हाधिकारी सातारा -रुचेश जयवंशी यांचे अध्यक्षतेखाली , प्रांताधिकारी मिनाज मुल्ला, गटाविकास अधिकारी रमेश काळे, व तालुक्यातील . सर्व विभागाचे अधिकारी यांचे उपस्थीतीत संपन्न होणार आहे.सदर कार्यक्रमांमध्ये दिवसभरात प्राप्त झालेल्या अर्जावर नियमानुसार कार्यवाही करून त्याचे निराकरण केले जाणार आहे .तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमास उपस्थित राहणेबाबत मेढा व केळघर मंडळातील सर्व जनतेस तालुका प्रशासन यांचे वतीने तहसीलदार जावली यांच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांमध्ये विविध विभागामार्फत खालील प्रमाणे लाभ देण्यात येणार आहे तहसील कार्यालय जावले मेढा यांच्या वतीने शिधापत्रिकेतील नाव कमी करणे ,वाढवणे, दुबार ,नवीन ,विभक्त शिधापत्रिका अर्ज स्वीकारले जातील.जातीचे दाखले ,नॉन क्रिमीलेयर दाखले, डोंगरी दाखले, डोमासाईल दाखले ,संजय गांधी योजना, इंदिरा गांधी योजना विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व योजनांचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत .

पंचायत समिती जावली मेढा यांच्या वतीने जन्म नोंदणी प्रमाणपत्र ,रहिवासी दाखला व प्रमाणपत्र विवाहाचा दाखला ,नोकरी व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र, मालमत्ता आकारणी प्रमाणपत्र ,बेरोजगार प्रमाणपत्र व इतर दाखले यांचे वितरण करण्यात येणार आहे .तालुका कृषी विभाग जावली मेढा यांचे वतीने कृषी यांत्रिकीकरणांतर्गत यंत्रे व अवजारे यांचे वाटप ,प्रधानमंत्री सुषमा अन्नप्रक्रिया उद्योग उभारणी मंजुरीचे पत्र देणे. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेअंतर्गत मंजूर प्रस्तावाचे पत्र वारसांना देणे .शेततळे काढणे .निवड झालेल्या शेतकऱ्यांना पूर्ण संमती पत्र देणे .मेढा नगरपंचायत विभाग प्रधानमंत्री आवास योजना व सोनेरी योजना याबाबत सविस्तर माहिती देणे. आरोग्य विभाग आबा कार्ड वाटप. इ कार्ड वाटप .हृदयरोग ,मधुमेह ,कॅन्सर, रक्तदाब ,रक्त तपासणी या योजनांचा लाभ देण्यात येणार आहेत .तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प जावली यांच्या वतीने माजी कन्या भाग्यश्री योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप ,त्याचप्रमाणे झिरो ते सहा वर्ष बालकांचे आधार कार्ड काढणे या सेवा देण्यात येणार आहेत .वनक्षेत्र विभाग ,वनपरिक्षेत्र विभाग यांचे वतीने वनवा प्रतिबंधक पथनाट्य ,वनवा, वन्यजीवन प्राण्यापासून पिकांचे संरक्षण कसे करावे याची माहिती देण्यात येणार आहे. तसेच एसटी महामंडळ यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक स्मार्ट कार्ड वाटप .विद्यार्थ्यांना पास वाटप करण्यात येणार आहेत. पशुधन संवर्धन विभाग यांच्यावतीने जनावरे तपासणी, वंदत्व तपासणी ,गोचर निर्मूलन, सलसीकरण ,शेळ्या ,मेंढ्या याबाबत माहिती देण्यात येणार आहे .तसेच विद्युत विभाग घरगुती मीटर वाटप व अर्ज स्वीकारणे या सेवा देण्यात येणार आहेत.

# पुणे-सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेसला जेऊर येथे थांबा द्यावा!

## अमरजित साळुंके यांची आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे मागणी

**करमाळा : प्रतिनिधी**

सोलापूर डिव्हिजन अंतर्गत जेऊर रेल्वे स्टेशन येथे सोलापूर -पुणे इंटरसिटी १२१५७-१२१५८ या गाडीचा थांबा मिळावा अशी मागणी भाजपा चे करमाळा तालुका सरचिटणीस अमरजित साळुंके यांनी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. कुर्डुवाडी येथे वंदे भारत मुंबई – सोलापूर या एक्सप्रेस च्या स्वागत प्रसंगी आ.मोहिते पाटील आले होते, यावेळी सोलापूर जि.प. चे माजी अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे, माजी सरपंच अजित तळेकर उपस्थीत होते.



हुतात्मा इंटरसिटी ही गाडी जेऊर येथे पुण्याकडे जाण्यासाठी सकाळी ८ वाजता व रात्री जेऊर येथे ८ वाजता ही वेळ करमाळा तालुक्यातील व परिसरातील प्रवाशांच्या अत्यंत सोईची आहे. ही गाडी इंद्रायनी गाडी प्रमाणेच फक्त बसून प्रवास करता येणारी आहे, या गाडीत स्लीपर कोच नाहीत, त्यामुळे ही हुतात्मा इंटरसिटी गाडी प्रवाशांसाठी सोईस्कर आहे.

विशेष म्हणजे हुतात्मा एक्सप्रेस ही सोलापूर डिव्हीजनची आपल्या हक्काची गाडी आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाशांची सोय लक्षात घेता हुतात्मा एक्सप्रेस या गाडीचा थांबा जेऊर येथे मिळावा अशी मागणी श्री साळुंके यांनी या निवेदनात केली आहे.

याप्रसंगी कुर्डुवाडी रेल्वस्थानक येथे डॉ.अमोल घाडगे, तात्यासाहेब गोडगे, भाजप करमाळा शहर अध्यक्ष जगदीश अगरवाल, सुदर्शन तळेकर, शाम सिंधी, नरेंद्रसिंह ठाकुर, सचिन चव्हाण, काकासो दगडे, ज्ञानेश्वर पवार आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांना मुस्लिमांचा द्वेष नव्हता; शिवरायांचा चुकीचा इतिहास सांगितला गेला

## विश्वास पाटील यांचे बार्शीत प्रतिपादन

**बार्शी : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शहाजीराजे हे कधीही मुस्लिमांचा तिरस्कार करत नव्हते. किंवा कधीही त्यांनी मुस्लिमांना दुश्मन मानले नाही, की त्यांचा द्वेषही केला नाही. असे असतानाही आजवर फक्त छत्रपती शिवरायांचा चुकीचा इतिहासच सांगितला आणि मांडला, हे दुर्दैव आहे, असे परखड मत ज्येष्ठ साहित्यिक आणि लेखक विश्वास पाटील यांनी बार्शीत व्यक्त केले.

येथील शिवशक्ति बँकेच्या वतीने डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ❋छत्रपतींचा धगधगता इतिहास-शहाजीराजे ते महासम्राट शिवाजी महाराज❋ या विषयावरील व्याख्यानात पाटील बोलत होते. या वेळी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, साहित्यिक डॉ. राजेंद्र दास, प्राचार्य व. न. इंगळे, प्राचार्य चंद्रकांत मोरे विचारपीठावर उपस्थित होते.



व्याख्यानात पाटील म्हणाले, निजामाच्या विरुद्ध लढताना सर्व प्रथम शहाजीराजे यांनी गनिमी कावा शोधून काढला. त्यांनी खूप हुशारीने गनिमी काव्याने निजामाच्या सैन्याला सळो की पळो करून सोडले होते. सन १६२४ च्या लढाईत 'हर हर महादेव' ही घोषणाही शहाजीराजे यांनीच केली होती. कारण त्याकाळात भोसले घराण्यावर शंकराची कृपादृष्टी होती. याचा दाखला आजही अनेक किल्ल्यावर शिवमंदिरे असल्याचे आपणास पाहायला मिळेल. शहाजीराजे हे संस्कृतचे खूप मोठे पंडित होते. त्याकाळी संपूर्ण राज्यात फक्त १४ संस्कृत पंडित होते त्यापैकी शहाजीराजे एक होते; असे सांगत संस्कृतमध्ये असलेली राजमुद्रा देखील छत्रपती शहाजीराजे यांनीच लिहिल्याचा दाखलाही विश्वास पाटील यांनी यावेळी दिला. छत्रपती शहाजीराजे यांचेकडे संगमनेर जवळील पेमगड पासून गोदावरी पर्यंत ६५ किल्ल्यांचे राज्य होते.

छत्रपती शिवरायांचा जन्म शिवनेरीवर झाला, शाहीसतेखानाची बोटे लाल महाल येथे छाटली, आग्रा येथून शिवाजी महाराजांची सुटका झाली, अशा प्रकारचा इतिहास शाळेत आपण शिकलो. किंबहुना या पलीकडे छत्रपतींचा इतिहास कोणी सांगितलाच नाही. पण आपल्यासाठी आणि येणार्या नव्या पिढीसाठी बापजाद्याचा इतिहास वाचलाच पाहिजे, असे आवाहनही यावेळी पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे पेटत्या निखार्यासारखे होते. बाजी प्रभू देशपांडे आणि नेताजी पालकर यांच्या सारखी जिवाला जीव देणारी माणसे छत्रपती शिवाजी महाराजांनी सांभाळून ठेवली होती. शिवराय फक्त अत्याचारी मुसलमाना विरोधी होते. सर्व मुसलमानाच्या विरोधात ते कधीही नव्हते, असे पाटील म्हणाले. शिवराय यांच्या बुद्धीचे तेज त्यांच्या तलवारीच्या लखलखत्या तेजाच्या किती तरी पटीने जास्त होते, असेही विश्वास पाटील यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पाटील यांनी त्यांच्या सव्वा तासाच्या व्याख्यानात अंगावर काटा आणणारे अनेक प्रसंग सांगितले. कार्यक्रमास सरव्यवस्थापक गणेश बारंगुळे, शाखाधिकारी विजय शिखरे यांच्यासह महिलांची संख्या लक्षणीय होती. सूत्रसंचालन प्रा. अशोक वाघमारे व प्रा. हनुमंत चव्हाण यांनी केले तर आभार बँकेचे सरव्यवस्थापक भारत उमाटे यांनी मानले.

# भाजपचे प्रदेश संयोजक आ. श्रीकांत भारतीय आजपासून सोलापूर जिल्हा दौऱ्यावर

**अकलूज : प्रतिनिधी**

भाजपचे प्रदेश संयोजक (निवडणूक इन्चार्ज) आमदार श्रीकांत भारतीय हे सोमवारी (दि. १३) सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. पंढरपूर येथे श्री विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेऊन, ते 'महाविजय २०२४' च्या संकल्प-सिद्धीचा प्रारंभ करणार आहेत.

शनिवारी (दि.११) नाशिक येथे पार पडलेल्या भाजप प्रदेश कार्यकारणीच्या बैठकीत आमदार श्रीकांत भारतीय यांची प्रदेश संयोजक पदी निवड करण्यात आली आहे. नाशिक येथून भाजपने २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. विधान सभेच्या किमान २०० जागांवर विजय मिळविण्याचे उद्दिष्ट पक्षाने ठेवले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उद्दिष्टपूर्तीची जबाबदारी आमदार भारतीय यांच्यावर सोपविली आहे.

**भाजपचे रणनीतीकार**

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत 'वॉर रूम'चे प्रमुख, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत 'प्रदेश निवडणूक व्यवस्थापन समिती समन्वयक', २०१५ ते २०१९ तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून काम पाहिलेल्या आमदार भारतीय यांच्याकडे २०२० पासून भाजपाचे प्रदेश सरचिटणीस पदाची जबाबदारी आहे. २०२४ च्या निवडणुका लक्षात घेऊन पक्षाने महाविजय २०२४ ची घोषणा केली आहे. त्याच्या संकल्प सिद्धीसाठी भाजपचे रणनीतीकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आमदार भारतीय यांच्यावर प्रदेश संयोजक पदाची जबाबदारी सोपविली आहे.

प्रदेश संयोजक पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आमदार भारतीय हे श्री विठ्ठल रखुमाईचा आशीर्वाद घेण्यासाठी सोमवारी पंढरपूरला येणार आहेत. श्री विठ्ठल रखुमाईचा आशीर्वाद घेऊन, आमदार भारतीय प्रदेश संयोजक पदाच्या कामाचा प्रारंभ करणार आहेत. त्यानंतर अक्कलकोट येथे जाऊन ते स्वामी समर्थांचे दर्शन हे घेणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यासह भाजपचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# विधानसभेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय शंकरराव जगताप यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध कार्यक्रम

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव तालुक्याचे माजी आमदार महाराष्ट्र राज्य विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि कोरेगाव एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय शंकररावजी जगताप यांचा जन्मशताब्दी महोत्सव मंगळवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ पासून सुरू होत आहे.

स्वर्गीय आमदार शंकराव जगताप यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त त्यांच्या कोरेगाव एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. तसेच ज्ञानवर्धक, पर्यावरण ,पूरक कार्यक्रमांचे आयोजन वर्षभर केले जाणार आहेत. या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त वर्षभर १४ फेब्रुवारी २०२३ ते १४ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान प्रत्येक महिन्याच्या १४ तारखेला कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे.

जन्मशताब्दी महोत्सवाची सुरुवात स्वर्गीय शंकराव जगताप यांच्या वाघोली (तालुका कोरेगाव )या जन्म गावापासून होणार आहे. मंगळवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी नऊ वाजता वाघोली (तालुका कोरेगाव) येथे स्वर्गीय आमदार शंकराव जगताप (आण्णा) यांच्या प्रतिमेची मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर दुपारी एक वाजता'' महाराष्ट्राच्या राजकारणातील सोनेरी पान''या विषयावर सभा संपन्न होणार आहे. सभेनंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम होणार आहे. स्वर्गीय आमदार शंकराव जगताप यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त वर्षभर प्रत्येक महिन्याच्या १४ तारखेला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जन्मशताब्दी महोत्सव १४ फेब्रुवारी २०२३ ते १४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये वर्षभर साजरा करण्यात येणार आहे. तरी या



जन्मशताब्दी महोत्सवामध्ये शंकराव जगताप यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आणि जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन कोरेगाव एज्युकेशन संस्थेच्या अध्यक्षा आणि शंकरराव जगताप यांच्या कन्या सुनिता ताई जगताप यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

कोरेगाव एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष आणि जिल्हा परिषद सदस्य भीमराव पाटील, संस्थेचे संचालक दत्तात्रय महाजन, जगन्नाथ कोरडे सर, चंद्रकांत वीरकर, यांनीही शंकराव जगताप यांच्या जन्मशताब्दी महोत्सवास मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन केले आहे. जन्मशताब्दी महोत्सव यशस्वी करण्यासाठी,कोरेगाव एज्युकेशन संस्थेचे सर्व मुख्याध्यापक ,सर्व शिक्षक ,सर्व कर्मचारी यांनी संपूर्ण नियोजन केले आहे.

# घनकचरा व्यवस्थापनासाठी उपठेकेदार : कामाच्या दर्जावर परिणाम शक्य

## प्रशासकांनी लक्ष घालण्याची तातडीची गरज

**सातारा : प्रतिनिधी**

सोनगाव कचरा डेपोच्या कामासंदर्भात चुका करा आणि त्यातून शिका ही प्रणाली सातारा पालिकेने पुढे सुरू ठेवली आहे घनकचरा व्यवस्थापनाच्या ठेक्यांमध्ये संबंधित नियुक्त ठेकेदाराने या कामासाठी उपठेकेदार नेमल्याचे समोर आले आहे. दुसरी संस्था परस्पर कशी नेमण्यात आली याला जाब विचारणारे लोकनियुक्त नगरसेवक नसल्यामुळे या कामाचा खोळंबा झाला आहे.

पालिका प्रशासनाने या परस्पर हस्तांतरणाला मूक संमती दर्शवल्याचे स्पष्ट होत असून प्रशासक अभिजीत बापट यांच्या राज्यात चाललय काय हाही प्रश्न निर्माण झाला आहे शहर आणि विस्तारित भागातील कचऱ्याचे संकलन केल्यानंतर त्यावर सोनगाव डेपोत प्रक्रिया होते यासाठी पालिका प्रशासनाने येथील कामे ठेकेदारी तत्त्वावर काहीजणांना दिली होती अशाच पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प चालवण्याचे काम पालिकेने परराज्यातील एका ठेकेदाराला दिले होते कामातील अनियमितता राजकीय प्रशासकीय हस्तक्षेप आणि इतर कारणांमुळे या कामांमध्ये अडचणी निर्माण होत होत्या वारंवारच्या या कटकटीला कंटाळून परराज्यातील त्या ठेकेदाराने पाच वर्षासाठी दिलेला ठेका मध्येच सोडला हे करण्यापूर्वी पालिकेने त्या ठेकेदाराला नोटीस बजावत बिल कपातीची कारवाई केली पालिका प्रशासनाची वारंवार होणार संघर्ष टाळण्यासाठी त्या ठेकेदाराने हे काम थांबवणे पसंत केले डेपोतील हे काम बंद असल्याने त्या ठिकाणी कचरा ढीग साचण्यास सुरुवात झाली त्यामुळे पालिका प्रशासनाने मध्यंतरीच्या काळात सुवर्ण मध्य काढत पुणे येथील एका ठेकेदाराला घनकचरा व्यवस्थापनाचे काम दिले या कामाच्या अनुषंगाने वारंवार ओरड होऊ लागल्याने पालिका प्रशासनाने कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा हा प्रयत्न केला या हालचालीसाठी देखील मध्यम मार्ग अवलंबण्यात आल्याची समोर येत आहे.

कामाचा ठेका घेतलेल्या पहिल्या ठेकेदारास काळ्या यादीत न टाकता त्याच्यावर कोणती ठोस कारवाई न करता त्याच्या संमतीने सोनगाव कचरा डेपोतील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी दुसरी संस्था व ठेकेदार नेमण्याचा निर्णय झाला या निर्णयावर पालिकेने नुकतेच शिक्कामोर्तब केले या परस्पर हस्तांतरणाविषयी विलक्षण आश्चर्य व्यक्त होत आहे पालिकेच्या सर्वच विभागात ठेकेदारांची मोठी साखळी आहे प्रशासकीय राजकीय वरदहस्तावर विविध कामे घेऊन नंतर ती टक्केवारी देऊन इतरांना विकण्याचे सुद्धा मोठे रॅकेट पालिकेत कार्यरत आहे या ठेकेदारांमुळे व त्यांच्या कार्यपद्धतीमुळे शहरातील विविध विकास कामांच्या दर्जाचा प्रश्न निर्माण होताना दिसतो कचरा डेपोतील काम आणि त्यांचे ठेके यापूर्वी वारंवार चर्चेत होते मात्र सध्या कार्यकारणी नसल्यामुळे प्रशासन सुसाट असून त्यांनी ठेकेदारा आणि नेमलेल्या संस्थेची मनोमिलन करत ठेक्याचे हस्तांतरण केले आहे भविष्यामध्ये हा पायंडा पालिका प्रशासनासाठी अडचणीचा ठरू शकतो.

# डाळमोडी येथे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात शेळ्या ठार

**वडूज : प्रतिनिधी**

खटाव तालुक्यातील डाळमोडी- हिंगणे गावच्या हद्दीवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याने डाळमोडी येथील रमेश साहेबराव शिंदे यांच्या मालकीच्या तीन मोठ्या शेळ्या व तीन लहान कोकरे ठार झाली आहेत. हा प्रकार वडूज नगरपंचायतीच्या कचरा डेपोमुळेच घडला असल्याची चर्चा आहे.

यावाबत अधिक माहिती अशी, गेल्या काही महिन्यात वडूज नगरपंचायतीचा कचरा डेपो हिंगणे रस्त्यावर हलवला आहे. या डेपोमध्ये ओला व सुका कचरा एकत्रच येत असतो. ओल्या कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कोंबड्यांची पखे, पाय, मृत उंदीर, घुशी व इतर मांसजन्य पदार्थ असतात. त्यामुळे कचरा डेपोच्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर असतो. या कुत्र्यांनी आता शेळ्यांचा फडशा पाडला. भविष्यात जनावरे तसेच शालेय विद्यार्थ्यांवर हल्ला करण्यास ही कुत्री मागेपुढे पाहणार नाहीत. अशा भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातून होत आहे.

**ओल्या कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासंदर्भात नगरपंचायत प्रशासनाने योग्य पावले उचलावीत. तसेच शेळी मालकांना प्रशासनाने तातडीने मदत द्यावी. अन्यथा परिसरातील खेडेगावच्या वतीने तीव्र लढा उभारण्याचा इशारा सरपंच संघटनेचे अध्यक्ष विजय शिंदे यांनी दिला आहे.**

## खटावचे माजी तहसीलदार विलासराव गडांकुश यांचे निधन

**वडूज : प्रतिनिधी**

चिंचणेर (निम), ता. सातारा येथील मूळ रहिवाशी व खटावचे माजी तहसीलदार विलासराव खाशाबा गडांकुश वय-७३ यांचे अल्पशा आजाराने वडूज ता खटाव येथील राहत्या घरी निधन झाले.

महसूल विभागात गोदाम रक्षक म्हणून त्यांनी सेवेला सुरुवात केली होती. वाई, पुणे, कोरेगाव, सातारा,वडूज याठिकाणी त्यांनी कामकाज केले. गेली अनेक वर्षांपासून वडूज येथे ते नोकरी निमित्त स्थाहिक झाले होते. खटाव तहसीलदार पदावरून ते सेवानिवृत्त झाले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुलगा कुणाल, कन्या, सुना, नातवंड, जावई, सून असा मोठा परिवार आहे. रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष कुणाल गडांकुश यांचे ते वडिल होते.

# अॅट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेण्यास शहर पोलिसांची टाळाटाळ

## व्यावसायिक महेश शिवदास यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**सातारा : प्रतिनिधी**



सातारा शहरामध्ये खाजगी फायनान्स कंपन्या कर्जाच्या नावाखाली अक्षरशः खाजगी सावकारी करत आहेत कर्ज फसवणुकीची तक्रार असताना ती दाखल करून घेण्यास सातारा शहर पोलीस टाळाटाळ करीत आहेत आणि माझ्यावरच खोटे गुन्हे दाखल करण्याचा आरोप करणाऱ्या उपनिरीक्षक शितल जाधव यांच्या विरोधात अॅट्रॉसिटी ची तक्रार देऊनही ती दाखल करून घेण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असा आरोप साताऱ्यातील कुशनं व्यावसायिक महेश शिवदास यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

येथील शासकीय विश्रामगृहामध्ये त्यांच्यावर गुदरलेल्या प्रसंगाची माहिती त्यांनी पत्रकारांना दिली ते म्हणाले ३० ऑक्टोबर २०२२ रोजी श्रीराम सिटी फायनान्स कंपनीकडून त्यांच्या चार चाकी वाहनावर त्यांनी कर्ज घेतले होते मात्र संबंधित कंपनीने एस पी फायनान्स कंपनीच्या सचिन पाटील यांना त्यांच्याशी करार नसताना त्यांना धनादेश देण्यास सांगितले .या फसवणुकी संदर्भात मी १ फेब्रुवारी २०२३ रोजी सातारा शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान निंबाळकर यांच्याकडे तक्रार देण्यासाठी गेलो होतो त्यांनी लेखी तक्रार देण्यास मला सांगितले . त्यावेळी कंपनीचे संचालक सचिन पाटील यांच्या नातेवाईक महिला पोलीस उपनिरीक्षक शितल जाधव यांनी तक्रार घेण्यास नकार देऊन तुम्ही खोटे गुन्हे दाखल करत आहात असा आरोप माझ्यावर केला व शहर पोलीस स्टेशनच्या पोर्चमध्ये अपमानास्पद वागणूक देऊन पोलीस स्टेशन मधील कर्मचाऱ्यांना एकत्रित करून भीतीदायक वातावरण तयार केले संग्राम पाटील व शीतल जाधव हे नातेवाईक असल्याने त्यांनी माझी तक्रार दाखल होऊ दिली नाही.

शितल जाधव यांची आता सातारा शहर म्हणून सातारा तालुका पोलीस स्टेशन येथे बदली झाली आहे आमच्यासारख्या दलित समाजाच्या माणसांनी न्यायासाठी कोणाकडे जायचे पोलीस अध्यक्ष समीर शेख यांनाही भेटून या संदर्भात अर्ज देण्यात आला आहे मात्र त्यांच्याकडूनही कोणतीही अद्याप कारवाई झालेली नाही यासंदर्भात जर मला न्याय मिळाला नाही तर यापुढे मी स्वतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा शिवदास यांनी पत्रकार परिषदेत दिला.

## यवतेश्वर घाटातून दुचाकीची चोरी

**सातारा : प्रतिनिधी**

यवतेश्वर घाटातून दुचाकीची चोरी झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ५ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते १२ दरम्यान यवतेश्वर, ता. सातारा येथील यवतेश्वर घाटात असलेल्या पाण्याच्या पाईपलाईन जवळ पार्क केलेली कुणाल राजाराम जाधव रा. शाहूपुरी, सातारा यांची बुलेट मोटरसायकल क्रमांक एमएच ०३ बीआर ४०८१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार पवार करीत आहेत.

# साताऱ्यात बॅटरीच्या दुकानाला आग लागून अडीच लाखांचे नुकसान

## ▪ शॉर्टसर्किटने आग लागल्याचा प्राथमिक अंदाज

**सातारा : प्रतिनिधी**

राजपथावरील पोलीस करमणूक केंद्राच्या परिसरात असणाऱ्या श्री समर्थ बॅटरी या दुकानाला शनिवारी रात्री उशिरा आग लागून सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले सुदैवाने या आगीमध्ये जीवित हानी झाली नाही अग्निशमन दलाच्या वतीने पाऊण तासाच्या आटोक्यात आणण्यात आली.

याबाबतची अधिक माहिती अशी नितीन चव्हाण यांचे पोलीस करमणूक केंद्राच्या परिसरात श्री समर्थ बॅटरी नावाचे दुकान आहे ते रात्री उशिरा नेहमीप्रमाणे दुकान बंद करून गेले असता काही वेळाने त्यांच्या दुकानातून धूर बाहेर येत असल्याचे काही नागरिकांनी पाहिले मात्र काही वेळातच आगीच्या ज्वालांनी दुकान वेढले गेल्याने परिसरात एकच धावपळ सुरू झाली काही सतर्क नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाल केंद्राला या आगीची कल्पना दिली अग्निशमन दलाचे वाहन तातडीने घटनास्थळी पोहोचले अर्ध्या तासांमध्ये आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र, तोपर्यंत आगीमध्ये बॅटऱ्या जळून तब्बल अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले या दुकानाचे मालक नितीन चव्हाण यांनी घटनास्थळी येऊन दुकानाची पाहणी केली असता बहुतांश दुकानातील साहित्य आगीच्या भक्षस्थानी पडले होते दुकानात शॉर्टसर्किट झाल्यामुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज यावेळी व्यक्त करण्यात आला आहे सुदैवाने या आगीची झळ जवळच्या कोणत्याही दुकानांना बसली नाही.

## पाच लाखांच्या फसवणूक प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

पाच लाखांच्या फसवणूक प्रकरणी एकावर फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक सहा जून २०२२ ते आजपर्यंत बुशा गरज्या पटले रा. आगरी पाडा, पोस्ट कारकदा धडगाव जिल्हा नंदुरबार याने २०२२-२३ या गळीत हंगामासाठी स्वराज इंडिया अॅग्रो लिमिटेड, उपळवे, ता. फलटण येथे ऊस तोडणी कामगार देतो असे सांगून औचित्रा बापू रणवरे रा. शिंदे नगर, तालुका फलटण यांच्याकडून पाच लाख रुपये घेऊन कोणीही ऊस तोडणी कामगार न देता आणि रणवरे यांचे पैसेही परत न करता त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे. याप्रकरणी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात पटले याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. बी. भोसले करीत आहेत.

# लोणंद येथे बैलगाडी पळवताना त्यामधून पडून बैलगाडीस्वार गंभीर जखमी

**लोणंद : प्रतिनिधी**

लोणंद येथे आयोजित केलेल्या लोणंद केसरी भव्य बैलगाडी शर्यतीत बैलगाडीचालक अरुण जाधव हे बैलगाडीवरून पडून गंभीर जखमी झाला आहे. बैलगाडी चालकास पुणे येथे पुढील उपचारासाठी नेण्यात आले आहे.

बैलगाडी शर्यतीत यापूर्वी एक जण ठार झाला असतानाच पुन्हा लोणंद येथील बैलगाडा शर्यतीत गाडी पळवताना बैल गाडीतून पडून आज लोणंद येथे बैलगाडी चालक गंभीर जखमी झाला आहे. त्यामुळे बैलगाडी शर्यतीच्या सुरक्षतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे .लोणंद येथील लोणंद - निंबोडी रोडवर भव्य लोणंद केसरी बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी दुपारच्या सुमारास बैलगाडी शर्यत सुरू असताना बैलगाडी चालक अरुण विठोबा जाधव वय ५० रा.कोरेगाव ता.फलटण हे बैलगाडीवरून पडल्याने मागे घसरत गेले या घटनेत त्यांची शरीराची एक बाजू पूर्णपणे जमिनीला घासत जाऊन बैलगाडी चालक गंभीर जखमी झाला आहे. त्यांना उपचारासाठी लोणंद येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते .प्राथमिक उपचारानंतर त्याला पुणे येथे हलविण्यात आले आहे . लोणंद पोलिसात एमएलसी दाखल करण्यात आली आहे.

या अपघाताची चौकशी केल्यानंतर लोणंद पोलिसात गुन्हा दाखल केला जाणार आहे.

# बसस्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ ट्रॅव्हल्स एजंटला मारहाण

**सातारा : प्रतिनिधी**

ट्रॅव्हल भरण्याचा व्यवसाय करायचा नाही, करायचा असल्यास आम्हाला २० हजार रुपयांचा हप्ता द्यायचा अन्यथा धंदा करुन देणार नाही, अशी दमदाटी करुन मारहाण केल्याप्रकरणी अनेकांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सातारा येथील बसस्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ दि. ९ रोजी रात्री ९.४५ च्या सुमारास ही घटना घडली.

या प्रकरणी ट्रॅव्हल्स एजंट किरण बिभिषण मेहर (वय २७, रा. आंदेकर चौक, करंजे, सातारा) यांनी नरेश भोसले, गोट्या तपासे, अनिकेत अशोक तपासे, आकाश महादेव खंदारे, आकाश कुमार खंदारे, सागर खंदारे, राहूल शिंदे, रोहित शिंदे, प्रदीप वसंत तपासे व इतर अनोळखी ५ ते ७ जण (सर्व रा. मल्हारपेठ, सातारा) यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सहायक फौजदार डी. जी. पवार तपास करत आहेत.

## वाढे येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सातारा** : वाढे येथे युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १० फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सात वाजण्याच्या वाढे, ता. सातारा येथील साई निवारा योजना, तिसरा मजला येथे प्रशांत हबगीराव मारफळे वय २३ मूळ राहणार मुखेड तालुका जिल्हा नांदेड याने बेडरूम मध्ये सिलिंगच्या हुकला बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार तोरडबल करीत आहेत.

# पक्षकारांनी सामंजस्याने व सुसंवादाने जास्तीत जास्त प्रकरणे मिटवावीत

## प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.एस.जाधव

**सातारा : प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि वकील संघ जिल्हा सातारा यांच्यावतीनेही राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी सामंजस्याने व सुसंवादाने तडजोड करुन जास्तीत जास्त प्रकरणे मिटवावीत, असे आवाहन प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश . एस. जाधव यांनी केले.





येथील जिल्हा न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या अदालतीचे उद्घाटन प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या उद्घाटन प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव बी.एम.माने, जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव मर्ढेकर यांच्यासह न्यायिक अधिकारी, वकील, पक्षकार उपस्थित होते.

राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जादा प्रकरणे निकाली निघावीत यासाठी पक्षकारांचे मनपरिर्वतन करावे. वाद हा सुसंवादातूनच मिटला जातो. पक्षकारांनी सुसंवादातून जास्तीत जास्त प्रकरणे मिटवावीत. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनीही लोकअदालतीला चांगला प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही श्री. जाधव यांनी केले.

राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सर्व प्रकारचे दिवाणी दावे व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली आहेत. जिल्हा न्यायालयात दाखल असलेली विविध प्रकरणे सामंजस्याने मिटावीत म्हणून २९ पॅनल व ऑनलाईन एक पॅनल कामकाजाकरिता आहे. जिल्ह्यात प्रलंबित सुमारे ९ हजार ७९६ प्रकरणे तर वादपूर्व ३ हजार ४९० प्रकरणे चर्चेसाठी ठेवली असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव बी.एम. माने यांनी सांगितले.

# लादी पाव विक्रेत्यांच्या संपामुळे ३० लाखांची उलाढाल ठप्प

## मैद्याचे भाव वाढल्याने विक्रेते हवालदिल

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील उंब्रज, कराड, कोरेगाव, रहिमतपूर ,पाचवड ,आणि परळी येथील सुमारे ५० हून अधिक लादी पाव विक्रेत्यांनी तीन दिवसाचा संप पुकारल्यामुळे सातारा शहर तालुका आणि परिसरातील लादीपावाची विक्री शुक्रवारी ठप्प झाली. गेल्या वर्षभरात मैद्याच्या किमतीत पाचशे रुपयांनी वाढ झाली व इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने लादी मागे दहा रुपये दरवाढ करावी लागणार असल्याचे लादी पाव असोसिएशनचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी सांगितले

सातारा शहरातील नागरिकांना तीन दिवस पावच उपलब्ध होणार नसल्याने खवय्यांची अडचण झाली आहे. सातारा शहर आणि परिसरात तब्बल ५० बेकरी असून रोजची पावची उलाढाल २५००० लादी आहे. एका लादीचा दर ४० रुपये गृहीत धरल्यास दिवसाची उलाढाल दहा लाखापर्यंत होते तीन दिवसाच्या या संपाचा सातारा शहर आणि परिसराला साधारण ३० लाख रुपयांचा फटका बसला आहे. लादी पाव असोसिएशनच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी सकाळी सेवन स्टार इमारत परिसरात बैठक घेऊन या संदर्भातील आपली भूमिका मांडली.

यासंदर्भात बोलताना संदीप शिंदे म्हणाले मैद्याचे दर १५ मार्च २०२२ पासून चौदाशे रुपयावरून आजपर्यंत तब्बल पाचशे रुपयांना वाढले आहेत. तसेच तेलाचा डबा पूर्वी अकराशे रुपयाला मिळत होता तो आता साडे सतराशे रुपयाला मिळत आहे. भट्टीसाठी लागणारे लाकूड चार रुपये मण मिळत होते ते आता नऊ रुपये मणं मिळत



आहे. त्यामुळे सर्वच कच्च्या मालाच्या किमती वाढल्यामुळे प्रत्येक लादी मागे दहा रुपये वाढीचा प्रस्ताव आम्ही दिला आहे मात्र लादी पाव महाग झाल्यास त्याचा फटका वडापाव विक्रेते हॉटेलवाले यांना बसणार आहे. सातारकरांनाही संप यशस्वी झाल्यास पन्नास रुपये दराने लादीपाव घ्यावा लागणार आहे असोसिएशनच्या सदस्यांनी सकाळी पोवई नाका येथे सुमारे कोरेगाव वरून येणाऱ्या ७० ते ८० पावलादी पकडल्या. संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांनी संप सुरू असल्याची जाणीव करून दिली त्यावेळी उभयतांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. सलग तीन दिवस म्हणजे रविवार पर्यंत संपत सुरू राहणार असल्याने सातारा शहर आणि परिसरामध्ये लादीपावाची तीव्र चणचण जाणवणार आहे रशिया आणि युक्रेन युद्धाचा फटका लादीपावाला बसला आहे. या दोन देशातील युद्धामुळे भारताने मदत म्हणून पंजाब आणि महाराष्ट्रातील बहुतांश गहू तिकडे पाठवल्यामुळे पावासाठी आवश्यक लागणारा गहू सुद्धा उपलब्ध होताना बऱ्याच अडचणी येत असल्याचे संदीप शिंदे यांनी सांगितले.

# नोकरीच्या आमिषाने ५ लाख १८ हजारांची फसवणूक

**सातारा : प्रतिनिधी**

नोकरीच्या आमिषाने तिघांनी ५ लाख १८ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २ ऑक्टोबर २०२० ते १० जानेवारी २०२३ दरम्यान कृष्णत विठ्ठल जगदाळे रा. कुमठे, ता. कोरेगाव यांना यांचा मुलगा धनंजय तसेच आणखी एकाला अग्निशमन दलात सातारा येथे नोकरीस लावतो असे सांगून जगदाळे यांचा विश्वास संपादन करून तसेच खोटे अपॉइंटमेंट लेटर देऊन जगदाळे यांच्याकडून अनिकेत भीमराव जाधव भीमराव पांडुरंग जाधव दोघेही रा. सुलतानवाडी, ता. कोरेगाव आणि ओमकार सुभाष साळुंखे रा. शिरढोण, ता. कोरेगाव यांनी ५ लाख १८ हजार रुपये घेऊन नोकरी न लावता जगदाळे यांची आर्थिक फसवणूक केली आहे. याप्रकरणी कोरेगाव पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक लोहार करीत आहेत.

# रॉड्रिग्जचं अर्धशतक, ऋचाची फटकेबाजी; भारताचा पाकिस्तानवर सात विकेट्सनं विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने पाकिस्तानचा सात विकेट्सनी पराभव करत टी २० विश्वचषकात विजयी सुरुवात केली. पाकिस्तानने दिलेले १५० धावांचे आव्हान भारतीय संघाने एक षटक आणि सात विकेट्स राखून आरामात पार केले. जेमिमा रॉड्रिग्ज हिने अर्धशतकी खेळी करत पाकिस्तानच्या तोंडून विजयाचा घास हिरावला. ऋचा घोष हिने ३१ धावांची खेळी करत चांगली साथ दिली. पाकिस्तानकडून नशरा संधू हिने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. पाकिस्तानच्या कर्मधाराची ६८ धावांची खेळी व्यर्थ ठरली. जेमिमा रॉड्रिग्ज हिला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.




पाकिस्तानने दिलेलं १५० धावांचं आव्हानाचा पाठलाग करताना शफाली वर्मा आणि यस्तिका भाटिया यांनी आक्रमक सुरुवात करुन दिली. पण ३८ धावांवर यस्तिका भाटिया हिच्या रुपाने भारताला पहिला धक्का बसला. यस्तिका हिने १७ धावांची खेळी केली. त्यानंतर जेमिमा आणि शफाली वर्मा यांनी भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण संधूने शफालीला बाद करत भारताला दुसरा धक्का दिला. शफाली वर्मा ३३ धावांवर बाद झाली. त्यनंतर जेमिमा हिने कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत भागिदारी करत विजयाकडे आगेकूच केली होती. पण पुन्हा एकदा संधू हिने विकेट घेत भारताला धक्का दिला. हरमनप्रीत कौर १६ धावा काढून तंबूत परतली. हरमनप्रीत बाद झाल्यानंतर भारतीय संघाच्या अडचणी वाढल्या होत्या.. पण जेमिमा आणि ऋचा घोष यांनी संयमी अन् तितकीच आक्रमक फलंदाजी केली. अखेरच्या चार षटकात ४१ धावांची गरज होती. त्यावेळी दोघींनी वादळी खेळी केली. दोघांनी अवघ्या तीन षटकात ४१ धावांचा पाऊस पाडला. १७ व्या षटकात ऋचा घोष हिने सलग तीन चौकार लगावत पाकिस्तानच्या तोंडूव विजय हिसकवला. जेमिमाने १९ षटकात राहिली सुरली कसर पूर्ण केली. ऋचा घोष आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी चौथ्या विकेटसाठी ३३ चेंडूत ५८ धावांची नाबाद भागीदारी केली. जेमिमाने ५३ धावांच्या खेळीत ८ चौकार लगावले. तर ऋचा घोष हिने ३१ धावांच्या छोटेखानी खेळीत पाच चौकारांचा पाऊस पाडला.

दरम्यान, पाकिस्तानची कर्णधार बिस्मा मारूफ हिने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण भारतीय गोलंदाजांनी तो निर्णय चुकीचा ठरवत अवघ्या दहा धावांवर पहिली विकेट घेतली. पण त्यानंतर बिस्मा मारूफ हिने कर्णधाराला साजेशी फलंदाजी करत अर्धशतक झळकावलं. बिस्मा मारूफने मोक्याच्या क्षणी संयमी आणि तितकीच आक्रमक फलंदाजी करत पाकिस्तानची धावसंख्या वाढवली.. बिस्मा मारूफ आणि आयशा नसीम यांच्या अर्धशतकी भागादारीच्या जोरावर पाकिस्तान संघाने २० षटकांत १४९ धावांपर्यंत मजल मारली. बिस्मा मारूफ हिने ५५ चेंडूत सात चौकारांसह ६८ धावांची खेळी केली. एका बाजूला विकेट पडत असताना बिस्मा हिने दुसरी बाजू लावून धरली. बिस्मा मारूफ आणि आयशा नसीम या दोघींपुढे भारतीय गोलंदाजांनी गुडघे टेकले. दोघींनी ४७ चेंडूत नाबाद ८१ धावांची भागिदारी केली. या भागिदारीच्या जोरावर पाकिस्तानचा संघ १४९ धावांपर्यंत पोहचला. आयशा नसीम हिने २५ चेंडूत झटपट ४३ धावांची खेळी केली. भारताकडून राधा यादव हिने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. दिप्ती शर्मा आणि पूजा वस्त्रकर यांनी प्रत्येकी एक एक बळी घेतला. यांच्याशिवाय इतर गोलंदाजांनाही एकही बळी घेता आला नाही.

# पाकिस्तानात ईशनिंदेच्या आरोपीची जमावाकडून पोलीस ठाण्यातून बाहेर काढून हत्या

## पोलिस वाचवण्याऐवजी गेले पळून

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानमध्ये जमावाने पोलिस ठाण्याबाहेर ईशनिंदा केल्याच्या आरोपावरुन एका आरोपीला बेदम मारहाण केली त्यात त्या आरोपीचा मृत्यू झाला. जमावाने पोलिस ठाण्यावर हल्ला केल्यावर त्यावेळी पोलिसांची तेथून पळ काढला. मात्र, त्यानंतर ते अतिरिक्त कुमक घेऊन घटनास्थळी पोहोचले. पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. मात्र पोलिसांनी ईशनिंदा करणाऱ्या आरोपीचा मृतदेह जाळण्यापासून वाचवला.

मोहम्मद वारिस (४५) असे मृत आरोपीचे नाव आहे. ही घटना पंजाब प्रांतातील नानकाना साहिब जिल्ह्यातील आहे. या घटनेनंतर नानकानाचे SP आणि SHO यांना निलंबित करण्यात आले आहे.

मोहम्मद वारिस यांच्यावर कुराणाचा अपमान केल्याचा आरोप होता. त्यानंतर रविवारी सकाळी त्याला अटक करण्यात आली. एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले- ईशनिंदेची बातमी कळताच शेकडो लोक पोलीस ठाण्यात दाखल झाले. लॉकअपचे कुलूप तोडून आरोपीला बाहेर काढण्यात आले आणि त्याला लाठ्या-काठ्याने मारहाण करण्यात आली, त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

पाकिस्तानी वृत्तपत्र 'द डॉन'च्या वृत्तानुसार, जमावाला आरोपीला फासावर लटकवायचे होते. पोलिसांनी वेळीच घटनास्थळ गाठून त्याला पोलीस ठाण्यात नेले. परंतू लोकांचा राग शांत झाला नाही. जमावाने पोलिसांच्या गाडीचा पाठलाग करीत पोलिस ठाणे गाठले. जमावाने पोलिस ठाण्यात गोंधळ घालत आरोपीला जमावाच्या ताब्यात देण्यास सांगितले, मात्र पोलिसांनी ते ऐकले नाही. त्यामुळे संतप्त जमावाने मुख्य गेट तोडून पोलिस ठाण्यात प्रवेश केला. याठिकाणी तोडफोड करून आरोपीला बाहेर नेऊन त्याला मारहाण करत त्याची हत्या केली.

जमावाच्या घातपाती हेतूने पोलीस कर्मचारीही घाबरले आणि त्यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातून पळ काढला. मात्र, नंतर इतर पोलिस ठाण्याचे पोलिसांची कुमक घेऊन तेथे पोहोचले, पण तोपर्यंत आरोपीचा मृत्यू झाला होता. मात्र पोलिसांनी आरोपीचा मृतदेह जाळण्यापासून वाचवला.

पाकिस्तानात जमावाने असे काही करण्याची ही पहिलीच वेळ नाही. डिसेंबर २०२१ मध्ये, श्रीलंकन फॅक्टरी मॅनेजरला प्रथम जमावाने मारहाण करून ठार मारले आणि नंतर ईशनिंदा केल्याच्या आरोपाखाली त्याला पेटवून दिले.

डिसेंबर २०२१ मध्ये सियालकोटमध्ये श्रीलंकेच्या व्यवस्थापकाला ईशनिंदेच्या आरोपावरून जिवंत जाळण्यात आले होते. प्रियंथा कुमारा नावाच्या या व्यक्तीच्या केबिनमध्ये एक पोस्टर फाटलेले आढळले असून त्यावर मोहम्मद असे लिहिले होते. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांनी हा पैगंबरांचा अपमान समजला.

पाकिस्तानमध्ये ईशनिंदाबाबत अतिशय कडक कायदे आहेत. यामुळे अनेकांना मारहाण करत ठार मारले जाते. एप्रिल २०१७ मध्ये मिशाल खानला मर्दान विद्यापीठात त्याच्या सहकाऱ्यांनी बेदम मारहाण केली होती. २०१२ मध्ये, बहावलपूरजवळ एका मतिमंद व्यक्तीला पोलिस स्टेशनमधून खेचून नेले आणि हिंसक जमावाने त्यास ठार मारले. तसेच दादो येथेही जमावाने पोलिस ठाण्यात घुसून ईशनिंदा करणाऱ्या आरोपीला जिवंत जाळले.

# मनाला आधार देण्यासाठी 'एकलव्य' व्हा!- प्रा.अनिल वर्तक

**पुणे : प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनातल्या ताणतणावांना सामोरे जात असताना हरपल्या जाणाऱ्या मन: स्वास्थ्याकडे बहुतेकांचे दुर्लक्ष होत आहे. निखळ वैद्यकीय आजार असलेल्या मनोरोगांना पूर्वसंचित अथवा वेडेपणा ठरविण्याचा समाजाचा कल आहे. मानसिक आजारांबाबतचे गैरसमज आणि अंध:श्रद्धा दूर करून सकारात्मक जाणीवजागृती करण्यासाठी एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ ही संस्था कार्यरत आहे. मानसिक आरोग्याबाबत काम करणाऱ्या संस्था, संघटना आणि मनुष्यबळाचा अभाव दूर करण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी त्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन संस्थेचे संस्थापक प्रा. अनिल वर्तक यांनी केले आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या काळात मोठ्या प्रमाणावर ताणतणावांना सामोरे जावे लागत आहे. त्याचा परिणाम व्यावसायिक कारकीर्द आणि नातेसंबंधांवर होत आहे. अर्थातच बहुसंख्य लोकांचे मनस्वास्थ्य बिघडून मनोरुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. मात्र शारीरिक आजारांप्रमाणे मानसिक आजारांबाबत समाजात जाणीवजागृतीचा अभाव प्रकर्षाने आढळतो. ही जागृती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम करण्याची आवश्यकता आहे.

मानसिक आजार हे इतर शारीरिक आजारांप्रमाणेच वैद्यकीय कारणामुळे निर्माण झालेले आजार आहेत. योग्य वेळी योग्य उपचार मिळाल्याने रुग्ण मानसिक विकारातून पूर्णतः बाहेर येऊ शकतो. त्यासाठी रुग्णाच्या स्वतःच्या प्रयत्नांबरोबरच त्याला कुटुंबीय आणि समाजाकडून सहकार्याची आवश्यकता असते. प्रत्यक्षात केवळ समाज नव्हे तर मनोरुग्णांच्या कुटुंबीयातही मनोविकारांबाबत अंधश्रद्धा आणि गैरसमज आढळून येतात. ते दूर करण्याचा वसा एकलव्यने घेतला आहे.

सर्वसामान्य लोकांमधले मनोविकारांचे गैरसमज दूर करणे, सकारात्मक जाणीव जागृती करणे, मनोरुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना आधार देण्यासाठी स्व मदत गट उभे करणे आणि मानसिक आरोग्याबाबत जाणीव जागृती करण्यासाठी मनुष्यबळ उभे करणे हे एकलव्याचे उद्दिष्ट आहे.

संस्थेच्या माध्यमातून विविध ठिकाणी मानसिक आरोग्याबाबत जाणीव जागृतीसाठी आणि मनोविकारांबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. व्याख्याने आणि दृक श्राव्य सादरीकरणाद्वारे समाजात मानसिक आजारांबाबत असलेले गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न केले जातात. त्याचप्रमाणे मनोरुग्णांनी त्यांच्या आजारातून बाहेर पडण्यासाठी त्यांना मनोबल प्राप्त व्हावे, त्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांनीही सहकार्य करावे या दृष्टीने संस्थेच्या वतीने स्व मदत गट स्थापन करून त्यांच्या नियमित बैठका घेतल्या जातात. मानसिक स्वास्थ्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असलेला मनुष्यबळाचा अभाव दूर करण्यासाठी स्वयंसेवकांची मोठी आवश्यकता आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देऊन स्वयंसेवक तयार करण्याचे कार्यही एकलव्यने सुरू केले आहे.

निरोगी समाजासाठी अत्यंत आवश्यक मात्र सध्या दुर्लक्षित असलेल्या मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या एकलव्याला समाजाकडून सकारात्मक प्रतिसादाची आवश्यकता आहे. आपल्या संस्था, संघटनेमार्फत मानसिक आरोग्याबाबत सादरीकरणाचे आयोजन करणे, आपल्या माहितीतील मनोरुग्ण अथवा त्यांच्या कुटुंबीयांना संस्थेपर्यंत आणणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रस असल्यास या कार्यात स्वयंसेवी वृत्तीने सहभागी होणे यासाठी एकलव्यने आवाहन केले आहे.

संपर्क : एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, सिद्धार्थ सहकारी गृहनिर्माण संस्था, शनिवार पेठ, पुणे. ईमेल eklavyafoundationmh@gmail.com, मोबाईल ९५०३७१०८५९, ९२२५५७५४३२.

# कम्युनिस्टांनी शेकडो काँग्रेसवाले मारले : अमित शहा

■ आज त्यांच्यासोबतच काँग्रेस 'इलू-इलू' करतंय, इगझच्या धास्तीने कट्टर शत्रू मित्र झाले

**त्रिपुरा : प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्रिपुरातील चांदीपूर आणि उनाकोटी येथे दोन निवडणूक सभांना संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि कम्युनिस्टांवर जोरदार घणाघात केला. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, शेकडो काँग्रेसवाले कम्युनिस्टांनी मारले, आज काँग्रेसवाले त्यांच्यासोबत 'इलू इलू' करू लागले आहे.



आगामी विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी भाजपकडून पराभव आत्ताच स्विकारलेला दिसत आहे. त्यामुळे कट्टर विरोधक काँग्रेस आणि डाव्यांसोबत एकत्र येवू लागले आहेत. परंतू बीजेपी सर्वसामान्यांचे सरकार आहे. लोकांचे काम करणारे सरकार असल्याचे शहा यांनी सांगितले. आदीवासांनी सन्मान देण्याचे काम मोदी सरकारने केले आहे.

पुढे बोलताना शहा म्हणाले की, त्रिपुरातील आदिवासींची दीर्घकाळ फसवणूक करणारे डावे आता जनतेची फसवणूक करण्यासाठी एका आदिवासी नेत्याला मुख्यमंत्र्यांचा चेहरा म्हणून प्रोजेक्ट करत आहेत. काँग्रेस, सीपीएम, टिपरा मोथा यांचा तिहेरी त्रास टाळायचा असेल तर डबल इंजिनचे सरकार बनवा, असे आवाहन शहा यांनी येथील सभेत जनतेला केले. मुळात जितेंद्र चौधरी हे उझख(च्) च्या मोठ्या आदिवासी नेत्यांपैकी एक आहेत. काँग्रेस आणि डाव्यांची युती झाल्यास त्रिपुरामध्ये मुख्यमंत्रीपदाचे दावेदार म्हणून त्यांच्याकडे पाहीले जात आहे.

गृहमंत्री म्हणाले की, तुम्ही काँग्रेसची राजवट पाहिली आहे. त्यांनी या राज्याचा विकास केला नाही. हे राज्य जशाच्या तसे ठेवले आहे. आमच्या पक्षाचे नेते बिप्लब देब नंतर माणिक शाह यांनी त्रिपुराचा विकास पुढे नेला आहे. राज्याच्या विकासासाठी गरीब मध्यम कुटुंबातील तरुणांना जोडण्याचे काम भाजपने केले आहे. काँग्रेसने कधीच आदिवासींचे कल्याण केले नाही. आपल्या पंतप्रधानांनी सर्वांना समान हक्काची संधी दिली आहे.

**२०२५ पर्यंत गरिबांना घरे देणार**

शहा यांनी निवडणूक सभेत सांगितले की, आज राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी झाले आहे. २०२५ पर्यंत गरिबांना घरे देऊ. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्कूटी मोफत दिली जाणार आहे. भाजप काहीही म्हणेल ते करतो. राज्यात बांबू लागवडीला चालना देण्यावर आम्ही भर देणार आहोत.

अमित शहा यांचा आठवडाभरातील हा दुसरा त्रिपुरा दौरा होता. ६ फेब्रुवारी रोजी त्यांनी दक्षिण त्रिपुरातील खोवाई जिल्हा आणि संतीरबाजार येथे दोन निवडणूक रॅलींना संबोधित केले. त्यावेळी शाह म्हणाले होते की, कम्युनिस्ट, काँग्रेस आणि मोथा पक्ष हे तिघेही एकत्र आहेत. काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षाची समोरासमोरून भेट झाली आहे, पण मोथा टेबलखालून भेटले आहेत.

# तुर्कीये-सीरियात २१ हजारांहून अधिक मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तुर्कीये आणि सीरियामध्ये भूकंपामुळे खूप विध्वंस झाला आहे. दोन्ही देशांमध्ये मृतांची संख्या सातत्याने वाढत आहे. आतापर्यंत २१ हजारांहून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. जखमींचा आकडा ७८ हजारांच्या पुढे गेला आहे. दरम्यान, यूएन मदत पाठवणाऱ्या युनिटचे प्रमुख मार्टिन ग्रिफिथ्स म्हणाले - भूकंपातील मृतांची संख्या दुप्पट होऊ शकते. ढिगारा हटवल्यानंतर मृतदेह बाहेर काढले जातील. बचावकार्य अंतिम टप्प्यात आहे. पण ते कधी थांबवावे हेच अद्याप कळत नाहीये.

त्याचवेळी सीरियामध्ये वेळेवर मदत पोहोचत नाहीये. भूकंपानंतर रस्त्यांवर साचलेला मलबा हे त्याचे कारण आहे. हरेम शहरात एका वडिलांनी सांगितले की, त्यांची मुलगी ढिगाऱ्याखाली गाडली गेली होती पण तिला कोणीही मदत केली नाही. अबू अली म्हणाले- माझी मुलगी भूकंपाच्या एका दिवसानंतरही जिवंत होती. ढिगाऱ्याखाली दबून २४ तास उलटूनही तिच्यापर्यंत मदत पोहोचलेली नाही. आमच्याकडे ढिगारा साफ करण्यासाठी कोणतीही मशीन नव्हती. आम्ही मदतीची वाट पाहत होतो. बराच वेळ गेला. मी स्वतः माझ्या हातांनी तिचा मृतदेह बाहेर काढला.

# 'मराठा वारिअर्स' निघाले 'पुणे ते नेपाळ' सायकल मोहिमेवर!

## २०२३ किलोमीटरचा प्रवास करणार पूर्ण..




**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या व्यक्ती समाजात विधायक बदल घडवितात आणि अशा व्यक्ती एकत्र येऊन बनलेला समूह इतिहास घडवितो. असाच एका ध्येयाने प्रेरित झालेला ग्रुप म्हणजे पुणे (महाराष्ट्र) येथील 'मराठा वारिअर्स.' अनेक साहसी मोहिमा यशस्वी केल्यानंतर यावर्षी पुन्हा एकदा हे वारिअर्स सज्ज झाले आहेत पुणे ते नेपाळ सायकल प्रवासासाठी!

या मोहिमेचा शुभारंभ रविवार, दि. १२ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ७ वाजता भोसरी (पुणे) येथून पीएमटी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. या सायकल मोहिमेत संदीप जगताप, बजरंग मोळक, विश्वास काशीद, प्रशांत जाधव, संतोष दरेकर, नारायण मालपोटे, निलेश धावडे हे वारिअर्स सहभागी झाले असून या मोहिमेचे नेतृत्व संदीप जगताप करत आहेत.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात म्हणजे २०२३ या वर्षातील मराठा वारिअर्सची ही पहिली मोहीम आहे. विशेष म्हणजे पुणे ते नेपाळ या मोहिमेचे अंतर देखील २०२३ किलोमीटर आहे. दोन देशांना जोडणार्या या प्रवासात सर्व सहभागी वारिअर्स मैत्रीचा, सामाजिक एकतेचा संदेश देत भारताने ७५ वर्षात केलेल्या प्रगतीचा आलेख सर्वदूर पोहोचविणार आहेत. पुणे येथून सुरुवात झालेली ही मोहीम पुढे इंदोर (मध्यप्रदेश), अयोध्या (उत्तर प्रदेश) अशी तीन राज्यांतून प्रवास करत नेपाळमधील काठमांडू शहरात येथे पोहोचणार आहे.

मराठा वारिअर्सने यापूर्वी २०१७ मध्ये लेह-लढाख बुलेट राईड, २०१९ मध्ये पुणे ते वाघा बॉर्डर सायकल प्रवास, २०२१ मध्ये पुणे ते पानिपत सायकल प्रवास आणि २०२२ मध्ये पुणे ते हम्पी बुलेट राईड अशा साहसी मोहिमा यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत.

पुणे येथून सुरू झालेली ही मोहीम आज सकाळी हुतात्मा राजगुरु, भगतसिंग, सुखदेव स्मृती स्थळ, राजगुरुनगर याठिकाणी पोहोचली. याठिकाणी'मराठा वारिअर्स'चे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी हुतात्मा राजगुरु, भगतसिंग, सुखदेव यांना अभिवादन करून सर्व सायकलस्वार यांचे सत्कार करण्यात आले. तसेच त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी महाराष्ट्र क्राईम बॉर्डर चे नितीन सैद, दावडी गांव चे मा. सरपंच संतोष गव्हाणे, आमदार सुनील अण्णा शेळके यांचे स्वीय्य सहाय्यक मंगेश कुलकर्णी, सागर जोशी, जैदवाडी गांव चे सदस्य विजय जैद, हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशन चे सचिव अमर टाटीया, माऊली सेवा प्रतिष्ठाण चे कैलास दुधाळे, दावडी गांव चे मा. सदस्य हारून शेख, किरण कहाणे, सुमित चासकर व राजगुरनगर वासीय उपस्थित होते.

# 'गृहसमृध्दी २०२३' घरकुल मेळाव्यातून पोलीस बांधवांच्या घराचे स्वप्न साकारेल : पोलीस अधीक्षक समीर शेख

**सातारा : प्रतिनिधी**

पोलीस बांधव हे समाजासाठी कायम अपेक्षित असतात पण समाजापासून ते कायम दूर किंवा उपेक्षितच राहतात. जेव्हा संपूर्ण समाज सण, समारंभ, उत्सव साजरे करत असतात तेव्हा पोलीस कर्मचारी आपल्या घरच्यांपासून दूर कुठेतरी ड्युटी बजावत असतो. यामुळे समाज जिवनापासून कायमच पोलीस कर्मचारी दूर असतात. निवृत्तीनंतर आपल्या पै-पाहुण्यांच्या मध्ये सहभागी होण्यासाठी प्रत्येकाला आपल्या हक्काचं घर असावं असं वाटत. याच संकल्पनेतून पोलीस कर्मचारी यांना सवलतीच्या दरात घरे मिळण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासन, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया सातारा शाखा व क्रेडाई सातारा यांच्या विद्यमाने आयोजीत गृहसमृध्दी २०२३ या घरकुल मेळाव्याचे अयोजन केले असल्याचे उद्गार सातारा जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. समीर शेख यांनी काढले.

जिल्हा पोलीस प्रशासन, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया सातारा शाखा व क्रेडाई सातारा यांच्या विद्यमाने आयोजीत गृहसमृध्दी २०२३ या घरकुल मेळाव्याच्या उदघाटन प्रसंगी समीर शेख बोलत होते. यावेळी बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया सातारा शाखेचे अध्यक्ष राजेश देशमुख, क्रेडाईचे अध्यक्ष राहुल वखारीया, बीएआयचे सेक्रेटरी ओंकार शिंदे, कौन्सील मेंबर सचिन देशमुख, सौ. अझा शेख, सातारा शहरचे पोलीस निरीक्षक भगवान निंबाळकर, सातारा तालुका पोलीस निरीक्षक श्री. घोडके, मंगेश वाडेकर, सागर साळुंखे व अन्य उपस्थीत होते.



**'गृहसमृध्दी २०२३' घरकुल मेळाव्याचा शुभारंभ करताना समीर शेख, सौ. अझा शेख शेजारी राजेश देशमुख, अजिनाथ शिराळ, भगवान निंबाळकर, राहुल वखारिया, मंगेश वाडेकर, सागर साळुंखे, श्री. घोडके व अन्य. (छाया : राहुल देशपांडे, सातारा.)**

यावेळी बोलताना समीर शेख म्हणाले की, बिल्डर्स असोसिएशन व क्रेडाई यांच्या सहकार्यामुळे या घरकुल मेळाव्याचे आयोजन करता आले आहे. यासाठी सातारा जिल्ह्यातील सर्व नामवंत बिल्डर्स , डेव्हलपर्स तसेच विविध बँकींग व वित्तीय संस्थाही या घरकुल मेळाव्यात सवलतीच्या दरात गृहकर्जे उपलब्ध करून देणार आहेत.

बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजेश देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की पोलीस बांधवांना घरे उपलब्ध करून देण्याचा सातारा जिल्हा पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या प्रामाणिक प्रयत्नाचा भाग म्हणजे गृहसमृध्दी २०२३ घरकुल मेळावा आहे. या प्रयत्नाला आमच्या संस्थेचा कायम हातभार राहील यात शंका नाही. पोलीस बांधवांना हक्काची घरं मिळावी म्हणून आमच्या सभासदांनी अनेक सवलती सादर केल्या आहेत याचा पोलीस बांधवांनी लाभ घ्यावा.

यावेळी प्रमुख मान्यवरांचा सत्कार राजेश देशमुख, राहुल वखारिया, सचिन देशमुख, मंगेश वाडेकर यांनी केला. कार्यक्रमाचे निटनेटके सूत्रसंचालन अनिल दातीर यांनी तर आभार प्रदर्शन ओंकार शिंदे यांनी केले. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक समीर शेख यांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन गृहप्रकल्पांची माहिती घेतली. या घरकुल मेळाव्यात सातारा , कराड, फलटण, खटाव, वाई व अन्य भागातील ९० हून अधिक बिल्डर्सनी सहभाग घेतला होते.